# शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय पुणे -१

१७ डॉ. आंबेडकर रोड, लाल देवळाजवळ पुणे-१

दुरध्वनी क्रमांक ०२०- २६१२२२१७ फॅक्स क- ०२०- २६१२२२१७

ई-मेल आयडी- dydpune@gmail.com वेब साईट- WWW.dydepune.com


## इयत्ता ११ वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०१६-१७

**प्रसिध्दी पत्रक**

**दिनांक २७.०६.२०१६.**

इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०१६-१७ साठी ची प्रथम गुणवत्ता यादी केंद्रीय प्रवेश समितीमार्फत दि.२७.०६.२०१६ रोजी सकाळी १०.३० वाजता ऑनलाईन जाहिर करण्यात आलेली आहे. याबाबत विद्यार्थ्यांना त्यांच्या भ्रमणध्वनी क्रमांकावर एसएमएस करण्यात आलेले आहेत. तसेच **http://pune.fyjc.org.in** या संकेतस्थळावर जावुन **Check Result (Round-1)** ऑप्शनवर क्लिक केल्यावर **Enter Application Form No -** येथे अर्जावर क्रमांक टाकल्यानंतर खालील बाजुस असलेल्या **Get Result** येथे क्लिक केल्यावर पहिल्या यादीत मिळालेले कॉलेज विद्यार्थी पाहू शकता.

प्रथम गुणवत्ता यादीनुसार ज्या विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणवत्तेनुसार व पसंतीक्रमांकानुसार जे कनिष्ठ महाविद्यालय मिळालेले आहे त्या कनिष्ठ महाविद्यालयात संबधित विद्यार्थ्यांनी दि.३०.०६.२०१६ सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत रु.५०/- भरुन आपला तात्पुरता प्रवेश निश्चित करावा. जे विद्यार्थी रु.५०/- भरुन आपला प्रवेश निश्चित करणार नाहीत अशा विद्यार्थ्यांना बेटरमेंट (उन्नत प्रवेशाची ) संधी मिळणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच तात्पुरता प्रवेश न घेतल्यास संबधित विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेतुन बाहेर जाईल व कोणत्याही परिस्थितीत ऑफलाईन प्रवेश **(Offline)** मिळणार नाही व असे **(Offline)** ऑफलाईन नियमबाहय प्रवेश रद्द केले जातील याची नोंद घ्यावी. म्हणून आपणांस जे कनिष्ठ महाविद्यालय मिळालेले आहे तेथे तात्पुरता प्रवेश आजच घ्यावा असे आवाहन इ.११ वी ऑनलाईन केंद्रीय प्रवेश नियंत्रण समितीकडुन करण्यात येत आहे.

ज्या विद्यार्थ्यांना पहिल्या यादीत प्रवेश मिळाला नाही त्या विद्यार्थ्यांना दुस-या यादीत उपलब्ध जागेनुसार प्रवेशासाठी कॉलेज मिळतील.

बेटरमेंटचे (उन्नत प्रवेश) प्रवेश हे ऑनलाईन पध्दतीनेच होणार आहेत यासाठी वेगळा फॉर्म भरण्याची आवश्यकता नाही याची नोंद घ्यावी.

mRaut
27.6.16

(मिनाक्षी राऊत)
सचिव
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
सहा.शिक्षण संचालक
पुणे विभाग पुणे-१